# तयारी सीताफळ बहर धरण्याची...

डॉ. प्रदीप दळवे, डॉ. युवराज बालगुडे, सुनील नाळे

**यंदाच्या वर्षी मॉन्सूनचे आगमन वेळेपूर्वीच होणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. बहर धरण्यासाठी पोषक वातावरण तयार झाले असून, बागायतदारांनी नियमितपणे बहराची तयारी सुरू करावी.**

सीताफळामध्ये मॉन्सूनच्या आगमनाबरोबर नैसर्गिक बहर येतो. परंतु पाण्याची उपलब्धता असल्यास लवकर म्हणजे उन्हाळ्याच्या सुरुवातीलाही बहर धरता येतो. उन्हाळी बहराची फळे सप्टेंबर-ऑक्टोबरदरम्यान काढणीस तयार होत असल्याने बाजारभाव चांगला मिळून अधिक आर्थिक नफा मिळतो. मागील वर्षी राज्यात भरपूर पाऊस झाल्याने चालू वर्षी उन्हाळ्यात पुरेसे पाणी उपलब्ध असल्याने काही शेतकऱ्यांनी उन्हाळी बहर धरला आहे. परंतु राज्यातील बहुतांश भागातील शेतकरी पावसाळी बहर धरणे पसंत करतात. पूर्वमोसमी पावसाने राज्यात सर्वच विभागात हजेरी लावल्याने बागांची सुप्तावस्था संपून नवीन फूट येऊ लागली आहे. त्यामुळे सीताफळ उत्पादक बहर धरण्याच्या तयारीला लागले आहेत. यंदाच्या वर्षी मॉन्सूनचे आगमन वेळेपूर्वीच होणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. बहर धरण्यासाठी पोषक वातावरण तयार झाले असून, बागायतदारांनी नियमितपणे बहराची तयारी सुरू करावी. सीताफळाच्या अधिक उत्पादनाकरिता बहराचे योग्य व्यवस्थापन करणे आवश्यक असते. बहर व्यवस्थापनात पुढील बाबींचा समावेश करावा.

## झाडांची छाटणी

१) बहर धरताना मे महिन्याच्या अखेरीस ते जून महिन्याच्या सुरुवातीला पावसाच्या अंदाजानुसार व सिंचन सुविधेच्या उपलब्धतेनुसार छाटणीची कामे सुरू करावीत.

२) अवकाळी पावसामुळे झाडांना नवीन फूट आली असल्यास छाटणी करताना ती काढून टाकावी.

३) छाटणी करताना मुख्य खोडावर वाढलेले पानसोट, कुजट वाळलेल्या व रोगट फांद्या, अनावश्यक तसेच दाटी करणाऱ्या फांद्या काढून टाकाव्यात.

४) मागील वर्षी छाटणी केलेल्या फांदीवर आलेल्या नवीन फुटींपैकी प्रत्येक फांदीचा शेंडा छाटून २५ टक्के, तर काही वेळेस ५० ते ७५ टक्के भाग काढून टाकावा.

५) झाडाची उत्पादकता ही झाडास मिळणारा सूर्यप्रकाश आणि त्याचे झाडामध्ये पसरणे यावरती अवलंबून असल्याने झाडाचा मध्यभाग मोकळा राहील अशा पद्धतीने छाटणी करावी.

६) छाटणीनंतर नवीन फूट फुटण्यापूर्वी झाडांच्या फांद्या आणि खोडावर एक टक्का बोर्डो मिश्रणाची (एक किलो चुना अधिक एक किलो मोरचूद प्रति १०० लिटर पाणी) तातडीने फवारणी करावी.

७) झाडाचे खोड जमिनीपासून दोन ते अडीच फुटांपर्यंत मोकळे करावेत. खोडावर १० टक्के तीव्रतेची बोर्डो पेस्ट लावावी.

८) छाटणीमुळे झाडांची नियंत्रित वाढ होते. झाडावर फळांची संख्या मर्यादित राखता येते. फळे आकाराने मोठी होतात तसेच फळांची गुणवत्ता सुधारते.



झाडांची झालेली पानगळ.



बागेतील झाडांची छाटणी करताना.



मुख्य खोडावर वाढलेले पानसोट काढताना.



छाटणी केलेली झाडे.



छाटणी केलेल्या बागेत बोर्डोमिश्रणाची फवारणी करताना.



छाटणी केलेल्या फांद्या गोळा करून विल्हेवाट लावावी

## बहर धरताना घ्यावयाची काळजी

- बहर धरण्यापूर्वी बागेची स्वच्छता करावी. त्यासाठी बागेत पडलेली पाने, फळे, झाडावर लटकलेली काळी आणि रोगट फळे गोळा करून खड्ड्यामध्ये पुरून टाकावीत.
- छाटणीनंतर बागेची आडवी उभी हलकी मशागत करून घ्यावी.
- बागेतील तणांच्या प्रादुर्भावावर नियंत्रण आणावे. पाण्याचा कार्यक्रम वापर करावा. पाण्याची बचत करण्यासाठी आच्छादनाचा वापर करावा. यासाठी प्लॅस्टिक आच्छादन, पालापाचोळा, उसाचे पाचट, वाळलेले गवत, लाकडाचा भुसा यांचा वापर करावा.

## अन्नद्रव्य व्यवस्थापन

- पूर्ण वाढ झालेल्या बागेतील झाडांना (पाच वर्षे व त्यापुढील) प्रति झाड ३० ते ४० किलो शेणखत किंवा ६ किलो गांडूळ खत आणि २५० ग्रॅम नत्र, १२५ ग्रॅम स्फुरद व १२५ ग्रॅम पालाश अशी खतमात्रा द्यावी.
- नत्राची निम्मी मात्रा तसेच स्फुरद व पालाशची संपूर्ण मात्रा पहिले पाणी देताना द्यावी. नत्राची उर्वरित मात्रा त्यानंतर ३० दिवसांच्या अंतराने द्यावी.

## पाणी व्यवस्थापन

- नैसर्गिक बहरात निव्वळ पावसाच्या पाण्यावरसुद्धा चांगले उत्पादन मिळते. मात्र पावसाचा खंड पडल्यास भारी जमिनीत पाच ते सहा आणि हलक्या जमिनीत तीन ते चार दिवसांनी जमिनीच्या मगदुरानुसार संरक्षित पाणी द्यावे.
- फळवाढीच्या काळात पाण्याचा ताण बसणार नाही याची काळजी घ्यावी.
- ठिबक सिंचनाच्या नळ्या झाडाच्या घेरालगत अंथरून घ्याव्यात. शिफारशीप्रमाणे खतमात्रा देऊन पाणी सुरु करावे.
- पाणी देण्याकरिता ठिबक सिंचनपद्धतीचा अवलंब केल्यास पाण्याची ५० ते ७० टक्के बचत होते, तसेच तणांचा प्रादुर्भाव कमी होतो.

– डॉ. प्रदीप दळवे, ८९८३३१०१८५
(अखिल भारतीय समन्वित कोरडवाहू फळपिके (अंजीर आणि सीताफळ) संशोधन प्रकल्प, जाधववाडी, ता. पुरंदर जि. पुणे)